Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri, Dist.- Dhule (MS)

# NATIONAL AND INTERNATIONAL COMMEMORATIVE DAYS, EVENTS & FESTIVALS

# INTERNATIONAL WOMEN'S DAY

## 8TH MARCH



**Prin. Dr.R.R.Ahire while delivering key note address**



**Prin. Dr.R.R.Ahire with the Girl students and Staff**


०८ मार्च 2021





लोकमत
मंगळवार ०९.०३.२०२१

# साक्रीत 'नारीशक्ती'चा सन्मान


साक्री -येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने " सन्मान नारीशक्तीचा " कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. उषा शेलार, प्रा. भारती खैरनार, प्रा.डॉ. ज्योती वाघमोडे, प्रा. सौदाणे त्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रा.एल.जी.सोनवणे, प्रा. सुनील पालखे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या योगेश्वरी बिरारीस, साक्षी पाटील, अनम पठाण, प्रतीक्षा देवरे, निशा गवळे या यशस्वी विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. प्रा. डॉ. ज्योती वाघमोडे, प्रा. उषा शेलार, प्रतीक्षा देवरे, निशा गवळी यांनी विविध उदाहरणाद्वारे महिलांच्या कार्यकर्तृत्वावर संवाद साधला.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा.एल.जी. सोनवणे, यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी भाषण करण्यापेक्षा सावित्रीबाई आचरणात आणा असा मौलिक सल्ला उपस्थितांना दिला. उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांनी "महिलाओं की कार्तबगारी " विषयी हिंदीत संवाद साधला. प्रास्ताविक, व सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. लहू पवार यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. विश्वास भामरे यांनी आभार मानले.



# साक्रीत 'नारीशक्ती'चा सन्मान

साक्री -येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने " सन्मान नारीशक्तीचा " कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. उषा शेलार, प्रा. भारती खैरनार, प्रा.डॉ. ज्योती वाकोडे, प्रा. सैंदाणे त्यांच्या ह सावित्रीबाई फुले आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रा.एल.जी.सोनवणे, प्रा. सुनील पालखे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम विविध स्पर्धामध्ये यश मिळविणाऱ्या योगेश्वरी बिरारीस, साक्षी पाटील, अनम पठाण, प्रतीक्षा देवरे, निशा गवळे या यशस्वी विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. प्रा. डॉ. ज्योती वाकोडे, प्रा. उषा शेलार, प्रतीक्षा देवरे, निशा गवळी यांनी विविध उदाहरणांद्वारे महिलांच्या कार्यकर्तृत्वावर संवाद साधला.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा.एल.जी. सोनवणे, यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी भाषण करण्यापेक्षा सावित्रीबाई आचरणात आणा असा मौलिक सल्ला उपस्थितांना दिला. उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांनी "महिलाओ की कर्तबगारी " विषयी हिंदीत संवाद साधला. प्रास्ताविक, व सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. लहू पवार यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. विश्वास भामरे यांनी आभार मानले.






API Premlata Gomase from Auramgabad Guiding to girl Student on the Occasion of International Women Day



लोकमत

# महिलांनी कायद्याचे ज्ञान ठेवणे गरजेचे : गोमासे

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री :** दिवसेंदिवस वाढणाऱ्या महिलांवरील अत्याचारांचा विचार केला तर महिलांनी स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी आपले आचरण, आत्मविश्वास सशक्तपणा आणि कायद्याचे ज्ञान असणे फारच महत्वाचे असल्याचे प्रतिपादन औरंगाबाद येथील पोलीस उपनिरीक्षक हेमलता गोमासे यांनी केले.

साक्री येथील सि. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मुलींसाठी आयोजित ऑनलाइन व्याख्यानात उपनिरीक्षक प्रेमलता गोमासे (जगताप) यांनी " महिलांचे कायदे आणि सुरक्षा " या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.अहिरे, उपप्राचार्य डॉ. ए. बी. पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. लहू पवार, युवती सभा प्रमुख डॉ. ज्योती वाकोडे, महाविद्यालयातील प्राध्यापिका, प्राध्यापक, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोमासे पुढे म्हणाल्या की कायदा आणि महिलांची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस आणि न्यायव्यवस्था यांची भूमिका महत्वाची असते. मुलींनी सुरक्षित आणि भयमुक्त राहण्यासाठी स्वतःची वागणूक, खंबीरपणा सोबत स्व- रक्षणाचे धडे घेणे गरजेचे आहे. मुलींनी अबला न राहता सबला होणे आवश्यक आहे. त्याच बरोबर स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना जिद्द , चिकाटी, मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्य असणे फार गरजेचे आहे. प्रेमलता गोमासे यांनी स्वतःचे अनुभव सांगून विद्यार्थिनींच्या स्वसंरक्षणाबाबतच्या प्रश्नांना उत्तरे देऊन शंकांचे निरसन केले. प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

Hello Dhule
Page No. 3 Mar 29, 2021
Powered by: erelego.com

पुण्यनगरी
रविवार
१० मार्च २०१९.

# स्त्री-पुरुष समानतेचा लढा संघटीतपणे लढायला हवा : डॉ. बच्छाव



**साक्री :** प्रत्येक कुटुंबाचा आधार महिला असते, महिलाच घराला घरपण देते तरीही ती निराधार आहे. म्हणून स्त्री, पुरुष समानतेचा लढा संघटीतपणे लढणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. विजय बच्छाव यांनी केले.

येथील सी. गो. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील युवती सभेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त 'स्त्री समानता : काल आणि आज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनंत पाटील होते. युवती सभेच्या प्रमुख प्रा.अनूपमा देवरे, कनिष्ट महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक उषा शेलार उपस्थित होत्या. डॉ.बच्छाव म्हणाले, मध्ययुगीन काळात स्त्रीला भोगवादी समाजाने दास्यत्वाची वागणूक दिली. तिला उपभोगवस्तूचा दर्जा दिल्याची खंत व्यक्त केली. एकविसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीने तिचे बळ ओळखुन समानतेसाठी काही दरवाजे मुक्त केले आहेत. तरीही हक्कांपासून वंचित असलेली स्त्री भयभीत आणि पीडित आहे, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणातून उपप्राचार्य डॉ. आनंद पाटील यांनी महिलांच्या सन्मानासाठी हिंदी साहित्याच्या योगदानाचा आढावा घेतला. यावेळी प्रा.विश्वास भामरे, प्रा.सचिन गोवर्धने, प्रा. अशोक सोनवणे उपस्थित होते. संयोजक प्रा. डॉ. लहू पवार, प्रा. पंकज अहिरे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. एस. साळुंके यांनी केले. प्रा. एस. सी. सोनवणे यांनी आभार मानले.

# INTERNATIONAL DAY OF YOGA

# 21ST JUNE





लोकमत धुळे, शुक्रवार, दि. २२ जून २०१८

## साक्रीच्या सी. गो. पाटील महाविद्यालयात योग व प्राणायाम

**विविध मान्यवरांची उपस्थिती : प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

लोकमत न्यूज नेटवर्क

साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी सात ते आठ या कालावधित 'योग व प्राणायाम' शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात योग शिक्षक प्रा. सुनील पालखे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य प्रा. अनंत पाटील, डॉ. वसंतराव देसले, प्रा. शशिकांत सुतार, संजय अहिरराव यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी योग शिक्षक प्रा. एस. डी. पालखे यांचे स्वागत केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. लहू पवार यांनी केले.

प्रा. लहू पवार

साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात योगासने करताना प्राध्यापक



लोकमत धुळे, बुधवार, दि. २२ जून २०१६

# सी.गो.पाटील कॉलेजात योग दिन

साक्री : येथील सी.गो. पाटील महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रा.सुनील पालखे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी सात वाजता एक दिवशीय योग शिबिर घेण्यात आले.

या वेळी प्राचार्य डॉ.आर.आर. अहिरे, उपप्राचार्य डॉ.आर.ए. देवरे, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघाचे खजिनदार प्रा.संजय सोनवणे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच आदर्श माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.ओ. देसले, जिजामाता कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एन. निकम, सर्व माध्यमिक शिक्षक, शिक्षक, माध्यमिक शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या योग शिबिरात योग शिक्षक सुनील पालखे यांनी त्रिकोणासन, भ्रामरी, उद्‌गीथ, उज्जयी श्वास इत्यादी प्राणायामांचा सराव करून घेतला. यापुढेही दररोज योग व प्राणायामाचा घरी नियमित सराव करण्याचा सल्ला या वेळी देण्यात आला. तसेच विविध आजारांवर आपण कायमस्वरूपी निरोगी राहण्यासाठी योग कशाप्रकारे उपयोगी आहे, याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

प्राचार्य आर.आर. अहिरे यांनी योग दिनाविषयी मार्गदर्शन केले. आभार उपप्राचार्य देवरे यांनी मानले. शिबिरासाठी भाजपाचे तालुकाध्यक्ष संजय अहिरराव, भाजपा युवाचे साक्री तालुकाध्यक्ष डॉ.देवेंद्र देवरे यांच्यासह शहरातील नागरिक उपस्थित होते.







लोकमत नंदुरबार, शुक्रवार, दि.२३ जून २०१७

## सी.गो. पाटील महाविद्यालयात प्रात्यक्षिके

◆ साक्री- येथील सी.गो. पाटील महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शहरातील विविध क्षेत्रातील योगप्रेमी, विद्यार्थी, विद्यार्थिनींसह शेकडो अनुयायी उपस्थित होते. योगवर्गासाठी धुळे येथील पतंजली योग समिती व भारत स्वाभिमान न्यासचे योगशिक्षक पांडे, योगशिक्षिका विजया राजपूत, प्रजापिता ब्रम्हकुमारी सेंटर साक्रीचे शिला दीदी यांनी मार्गदर्शन केले. सकाळी सात ते आठ वाजेदरम्यान विविध योग आसनांसह सुक्ष्म व्यायामांचा अभ्यास केला. या योग शिबिरात प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे, डॉ.संजय सोनवणे, डॉ.लहू पवार, डॉ.शत्रुघ्न पाटोळे, डॉ.ए.पी. निकम, प्रा.एस.डी. पालखे, प्रा.ज्ञानेश्वर सोनवणे, आदर्श माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.ओ. देसले, सर्व शिक्षक, जिजामाता कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.एन. निकम, सर्व शिक्षक, प्राध्यापक, प्रजापिता ब्रह्मकुमारी सेंटरचे मार्गदर्शक एस.एम. जाधव, विद्यार्थी, विद्यार्थिनी व शहरातील नागरिक उपस्थित होते. क्रीडा शिक्षक प्रा.हसीन तडवी, किशोर अहिरराव व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. आभार प्रा.लहू पवार यांनी मानले.






पुण्य नगरी


शनिवार

२२ जून २०१९

# सी.गो.पाटील महाविद्यालय, साक्री

**साक्री :** येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात योग दिवस साजरा करण्यात आला.

येथील विद्याविकास मंडळाच्या सी. गो. पाटील महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिर झाले. महाविद्यालयाच्या प्रांगणात धुळे येथील पतंजली योग समितीचे योगगुरु दिलीप बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासनांच्या विविध प्रकारांचे प्रात्यक्षिक झाले. दिलीप बोरसे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. आर. आर. आहिरे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. लहू पवार यांनी केले. योग शिबिरासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य प्रा. अनंत पाटील यांनी सहभाग घेतला.






दैनिक दिव्य मराठी

22
धुळे

# कोरोनाला प्रतिबंधासाठी योग करा : डॉ.अहिरे

**साक्री** | कोरोनाला प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येकाने योगासन व प्राणायाम करावे. योगाच्या माध्यमातून रोग प्रतिकारशक्ती वाढवून सुदृढ आयुष्याचा मंत्र आत्मसात करावा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व उच्च शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात ऑनलाइन योग उपक्रम झाला. त्या वेळी ते बोलत होते. योगा अॅट होम अॅण्ड योगा विथ फॅमिली या संकल्पनेंतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. प्रा. सुनील पालखे यांनी प्रार्थना सादर केली. डॉ. हसीन तडवी यांनी विविध योगासने सादर केली. डॉ. प्रितम तोरवणे यांनी प्राणायामाची माहिती दिली. डॉ. संजय सोनवणे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, आयक्यूएसी प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी संयोजन केले. कार्यक्रमाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते.





# सी. गो. पाटील महाविद्यालय




साक्री : योग हा भारताने जगाला दिलेला अमुल्य ठेवा असून महामारीच्या काळात मानवी आयुष्य अधिक सुदृढ व सकारात्मक करण्यात योगासनांचे महत्त्व अतुलनीय असल्याचे मत प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी व्यक्त केले. विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे योग दिनानिमित्त सहप्रात्यक्षिक योगाभ्यास झाला. याप्रसंगी ते बोलत होते.योग प्रशिक्षक व महाविद्यालयाच्या रसायनशास्त्राचे प्रा. सुनील पालखे आणि डॉ. प्रीतम तोरवणे यांनी योग प्रात्यक्षिक करवून घेतले याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी बांधव उपस्थित होते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी ऑनलाइन लाभ घेतला. विविध प्राणायाम, योगासने व प्रार्थना घेण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, डॉ. हसीन तडवी, शरद बोरसे आदींनी प्रयत्न केले.

# REPUBLIC DAY

# 26 JANUARY













# INDEPENDENCE DAY

# 15 AUGUST










विद्या विकास मंडळ, साक्री



विद्या विकास मंडळ, साक्री

# SPORTS DAY
# 29 AUGUST









# MARTYR'S DAY / HUTATMA DIN

# 30 JANUARY





# WACHAN PRERANA DIN

# 15 OCTOBER









# वाचनातून जीवन सुखी करावे–डॉ.अहिरे



**साक्री ★ खान्देश खबर वृत्त ★**

आयुष्य समृद्ध व संपन्न करण्यासाठी पुस्तक मार्गदर्शक म्हणून प्रमुख भूमिका निभावतात, वाचनाची आवड निर्माण करून प्रत्येकाने आपले जीवन सुखद करावे,असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरेंनी केले.

ते विद्या विकास मंडळाचे सि.गो.पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे ग्रंथालय विभागाच्यावतीने भारतीय ग्रंथालय शास्त्राचे प्रणेते पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या १२९ व्या जयंती दिनी राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी पी पाटील, कार्यालयीन अधीक्षक नंदलाल अहिरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ.राजेंद्र आहिरे म्हणाले की, प्रत्येकाने वाचनाचा ध्यास अंगीकारून आयुष्यातील समस्यांवर व प्रश्नांवर मात करावी. वाचन संस्कृती अधिक सुस्थिर होण्याच्या दृष्टीने आजच्या दिनाचे महत्त्व अधिक असल्याचे देखील त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.सचिन वाघ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथालयीन कर्मचारी पी.एल.चौधरी, गौरव देसले, शामराव सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी बांधव उपस्थित होते.





# RANGNATHAN JAYANTI

# 12 AUGUST




दिव्य मराठी धुळे सिटी 13-08-2020

## अध्ययनासह संशोधनाच्या कार्यात ग्रंथालयाची भूमिका ठरते महत्त्वपूर्ण



डॉ.रंगनाथन जयंतीनिमित्त कार्यक्रमात प्रतिमापूजन करताना प्राचार्य डॉ.अहिरे, डॉ.अनंत पाटील व उपस्थित.

### प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी** | साक्री

महाविद्यालयाचे ग्रंथालय हे महाविद्यालयाचा अविभाज्य घटक असुन, अध्ययन अध्यापन व संशोधन कार्यात या विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. याचबरोबर व्यक्तिमत्त्व घडवण्यात ग्रंथालय मोलाची भूमिका बजावत असतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी केले. ते डॉ. रंगनाथन जयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात बोलत होते.

विद्या विकास मंडळ संचलित सी.गो.पाटील महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस' फिजिकल डिस्टन्सिंगचे पालन करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. राजेंद्र अहिरे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील यांनी एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्राचार्य अहिरे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकेत ग्रंथपाल सचिन वाघ यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय शास्त्रात केलेल्या भरीव कार्याची संक्षिप्त माहिती सांगितली. कार्यक्रमाचे आभार ग्रंथालय समितीचे सदस्य डॉ. व्ही.बी.बच्छाव यांनी मानले. कार्यक्रमासाठी श्री. चौधरी,श्री. सुर्यवंशी यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राध्यापकही उपस्थित होते.

# N. S. S DAY

# 24 SEPTEMBER



शि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री, जि.धुळे
रासेयोजना उद्घाटन कार्यक्रम बातमी

लोकमत पुणे, गुरुवार, दि.२५ ऑगस्ट २०१६



## संस्कारांनी चांगला समाज घडवा

**प्रा.राम पेठारे : पाटील विद्यालयात रासेयो एकक उद्घाटनप्रसंगी प्रतिपादन**

Programme Officer
N. S. S.
V.V.M's S.G.Patil Arts,
Science & Commerce College
SAKRI, Dist.Dhule

Principal,
V.V.M.'s S. G. Patil
Arts Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.


राष्ट्रीय सेवा योजना
उद्घाटन समारंभ
राष्ट्रीय सेवा योजना













पुण्य नगरी

# सी.गो.पाटील महाविद्यालयात एनएसएस एककाचे उदघाटन






लोकमत जळगाव, शुक्रवार, दि. २३ ऑगस्ट २०१९

विजय भोसले : साक्री येथे २०१९-२० या वर्षातील कार्यक्रमांच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रतिपादन

# राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे समाजसेवा गुणाचा विकास

उद्घाटनप्रसंगी विजय भोसले, डॉ. राजेंद्र अहिरे, डॉ. आनंद पाटील, योगेश नेहे, प्रा. विश्वास भामरे आदी.



Zoom Meeting
Dr. Deepqk Nag...
Recording...
LIVE
on Custom Live Streaming Service
Participants (25)
Find a participant
Dr.Manohar M Saindane
Kishor Mulutrao More
Lahu Pawar
Pradip Rathod
Prin.Dr.Rajendra Ahire
Prof A P Sonawane
Prof.Laxman Patil
Raju Devkar
Sachin Wagh
Sadhana Patil
Sangam
Santosh Bhavsar
Vikas Dhangar
Invite
Mute All
Type here to search
10:37 AM
4/14/2021

# N.S.S DAY

# 24 SEPTEMBER





# AIDS AWARENESS DAY

# 01 DECEMBER










सकाळ
धुळे, सोमवार,
४ डिसेंबर २०१७

# साक्री ग्रामीण रुग्णालयातर्फे एड्स जनजागृतीपर रॅली

**सकाळ वृत्तसेवा**

साक्री, ता. ३ : जागतिक एड्स दिनानिमित्त येथील सी. गो. पाटील कनिष्ठ महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयाच्या एकात्मिक समुपदेशन व तपासणी केंद्रातर्फे आज जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये सी. गो. पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, तसेच समुपदेशन केंद्राचे अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

महाविद्यालयात प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले. ग्रामीण रुग्णालयात रॅलीचा समारोप झाला. तेथे ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. साधना पाटील यांनी विद्यार्थ्यांना एड्स आजाराविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना शपथही देण्यात आली. रॅलीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत पर्यवेक्षक प्रा. के. जी. पाटील, प्रा. डॉ. आर. जे. काकुस्ते, प्रा. आनंद पाटील, प्रा. आर. पी. देवरे, प्रा. डी. पी. पाटील, प्रा. एम. वाय. कुवर, प्रा. डी. एम. पानपाटील, प्रा. पी. एस. सोनवणे, प्रा. यु. ए. शेलार, प्रा. बी. एन. खैरनार, समुपदेशन केंद्राचे योगेश नांद्रे, दीपक सूर्यवंशी, दत्तू हाके, सोनाली परदेशी, शीतल गावित आदी सहभागी झाले होते.

साक्री : ग्रामीण रुग्णालयात जागतिक एड्स दिनानिमित्त काढण्यात आलेल्या जनजागृती रॅली समारोपप्रसंगी उपस्थित सी. गो. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, डॉक्टर, समुपदेशक आदी.

(छायाचित्र : धनंजय सोनवणे)




Latitude: 20.994975
Longitude: 74.318192
Elevation: 438.28m
Accuracy: 10.5m
Time: 09-12-2019 10:18
Note: aids janjagruti
Powered by NoteCam


कार्यालय


कार्यालय
सी.गो.पाटील कला,विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय,साक्री
हे करा... स्वताला व इतरांना सुरक्षित ठेवा
तोंडाला मास्क लावावे.

## SADBHAVNA DIWAS
## 20 AUGUST



## DEATH ANNIVERSARY OF LOKMANY TILAK & BIRTH ANNIVERSARY OF SHAHIR ANNABHAU SATHE



# KAI. SAU. GOJARTAI BHAMARE SMRUTIDIN

# 29 AUGUST



मा.आमदार कै.सौ.गोजरताई भामरे स्मृतीदिन क्षणचित्रे

मा.आमदार कै.गोजरताई भामरे यांच्या प्रतिमेस अभिवादन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा.सौ.ताईसाहेब मंगला सुरेश पाटील, सचिव मा.आबासो.सुरेश पाटील व मान्यवर

रक्तदान शिबिरावेळी रक्तदात्याची विचारपूस करतांना संस्थेचे सचिव मा.आबासाहेब सुरेश पाटील सोबत संस्थेचे सभापती

युवती सभेच्या उद्घाटनाप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना प्रा.डॉ.वंदना पाटील व मान्यवर



# गोजरताई भामरेंच्या स्मृतीनिमित्त स्पर्धा

## सी. गो. पाटील महाविद्यालयात रक्तदान शिबिरासह युवती सभेचे उद्घाटन



शि.गो. पाटील महाविद्यालय, साक्री, जि.धुळे

बातमी

**पुण्यनगरी**

## माजी आ. कै. गोजरताई भामरे स्मृतिदिनी कार्यक्रम





Programme Officer
N. S. S.
V.V.M's S.G.Patil Arts,
Science & Commerce College
SAKRI, Dist.Dhule

Principal,
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College,
SAKRI, Dist. Dhule.












३० ऑगस्ट २०१८

# रक्तदान करून गोजरताईंना आदरांजली

## साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात स्मृतीनिमित्त आदर्शवत उपक्रम





पुण्य नगरी

# गोजरताई भामरे यांच्या स्मृतीदिनी विविध उपक्रम



लोकमत

# कठोर मेहनत, अभ्यासूवृत्तीमुळे यश शक्य

## डॉ.लता मोरे : साक्रीतील पाटील महाविद्यालयत व्याख्यानात प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री :** महाविद्यालयीन तरुणीनी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचा वापर करुन जीवनात स्वावलंबनाचा मार्ग अंगीकारावा. कारण कठोर मेहनत, प्रामाणिकपणा आणि अभ्यासू वृत्ती या त्रिगुणी च्या जोरावर यशाला सहज गवसणी घालणे शक्य होते असे प्रतिपादन नवापूर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.लता मोरे यांनी केले.

**त्या साक्री येथील सी गो पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत युवती सभा आयोजित माजी आमदार कै. गोजरताई भामरे स्मृतिदिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यानात 'जीवन कौशल्य आणि स्वयंरोजगाराच्या संधी' या विषयावर त्या बोलत होत्या.** याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे अध्यक्षस्थानी तर तहसीलदार प्रविण चव्हाणके, विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ डी एल तोरवणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील उपस्थित होते.



सी. गो. पाटील महाविद्यालयात व्याख्यानाप्रसंगी उपस्थित मान्यवर

डॉ लता मोरे पुढे म्हणाल्या की, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना संगणक, टेलरींग, गृहविज्ञान,मातीच्या वस्तू बनविणे इत्यादी मध्ये आवड असणाऱ्यांनी त्यातील विविध सुरेख वस्तू निर्माण करुन स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याच बरोबर युवतींसाठी जीवन कौशल्यावर आधारित वेगवेगळ्या व्यवसायिक गोष्टींविषयी देखील त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी युवतींनी आपल्या आवडीनुसार व अंगभूत गुणांना जोपासून ध्येय निश्चित करत यशस्वी जीवन जगावे. गोजरताई भामरे यांनी घालून दिलेला आदर्श विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा मंगलताई सुरेश पाटील समर्थपणे चालवीत असून त्याचा आदर्श सर्व विद्यार्थिनींनी आपल्या जीवनात घ्यावा असे देखील प्रतिपादन केले. कार्यक्रमाला विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील, अध्यक्षा मंगला पाटील, उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

Hello Dhule
Page No. 2 Aug 31, 2020
Powered by: erelego.com

# TEACHER DAY
# 5 SEPTEMBER








Administrative Office

# BIRTH ANNIVERSARY OF MAHATMA GANDHI & LAL BAHADUR SHASTRI







आपला महाराष्ट्र
शनिवार ५ ऑक्टोबर २०१९

# गांधीजींनी देशासोबत माणूसही स्वतंत्र केला : प्रा.सोनवणे

साक्री (प्रतिनिधी)- साध्य उच्चकोटीचे असेल तर त्यासाठीची साधने देखील शुद्ध असावी लागतात. म्हणून असहकार, हरताळ, सविनय कायदेभंग, उपोषण, बहिष्कार इत्यादी आयुधांच्या माध्यमातून गांधीजींनी देश आणि माणूस स्वतंत्र केला, असे प्रतिपादन प्रा.एस.सी. सोनवणे यांनी केले.

साक्री येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात गांधीजींच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त गांधीजींचे तात्विक विचार या विषयावर



प्रा.सोनवणे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील व कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा.शेलार उपस्थित होत्या. प्रा.सोनवणे पुढे म्हणाले की, गांधीजींनी आपल्यातील उणिवा व दोष कधीही लपवून न ठेवता त्याविषयी माझे सत्याचे प्रयोग या पुस्तकातून सत्य ते सांगितले. सत्य व उणिवा कबूल करण्याचे धाडस प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात करावे, असे देखील त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी महात्मा गांधीजींची जयंती फक्त फोटो पूजनापुरती मर्यादित न राहता त्यांचे विचार आत्मसात करुन राष्ट्र उभारणीसाठी युवकांनी पुढे यावे. तसेच तरुणांनी भौतिक सुखात न गुंतता गांधीजींच्या आदर्श विचारांचे आचरण करून समाजात चांगल्या व पोषक वातावरणाची निर्मिती करावी असे देखील प्रतिपादित केले. सूत्रसंचलन प्राध्यापक प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ.एस.एस.पाटोळे यांनी केले तर आभार प्रा.एस.आर. गोवर्धने यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच एन.सी.सी.चे स्वयंसेवक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.





# NATIONAL YOUTH DAY & BIRTH ANNIVERSARY OF SWAMI VIVEKANANDA

# 12 JANUARY












पुण्य नगरी

मंगळवार, १५ जानेवारी २०१९ | धुळे

## सी.गो.पाटील महाविद्यालय

**साक्री :** येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात युवा दिनानिमित्त डॉ.प्रितम तोरवणे यांनी 'स्वामी विवेकानंद युवकांचे प्रेरणास्थान' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.सुनील पालखे, प्रा.डॉ.शत्रुघ्न पाटोळे उपस्थित होते. आर.सी.पटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी तृतीय वर्ष विज्ञानच्या विद्यार्थ्यांसाठी युवा संदेश स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत सोनाली गवळे व रिना घरटे यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. सूत्रसंचालन प्रा.सुनील पालखे व आभार प्रा.तडवी यांनी मानले.

# Rajmata Jijausaheb and Swami Vivekananda Birth Anniversary

सकाळ
जळगाव, बुधवार, १३ जानेवारी २०२१



साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात जिजाऊमाता व स्वामी विवेकानंदांना अभिवादन करताना प्राध्यापक.

## 'जिजाऊ सर्वांसाठी मार्गदर्शक'

**म्हसदी, ता. १२ :** भारतातीलच नव्हे तर जगातील तमाम स्त्री वर्गास आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यास मार्गदर्शक ठरेल, असे दिव्य चरित्र आपल्याला राजमाता जिजाऊ यांच्या जीवनात दिसून येते.

आपल्या अंतरंगात असलेल्या गुणांना प्रभावित करण्याचे सामर्थ्य राजमाता जिजाऊ यांच्या चारित्र्यात दिसून येतात. त्यांचे अवलोकन करणे हे समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत रोहिणी पाटील यांनी जिजाऊ जन्मोत्सवाप्रसंगी व्यक्त केले. साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात राजमाता जिजाऊसाहेब जयंती, तसेच स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. प्राचार्य बी. एम. भामरे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. आर. आर अहिरे, प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, डॉ. सचिन नांद्रे, डॉ. अनंत पाटील, दीपक नांद्रे, शीतल सनेर, विकास पाटील, ॲड. पूनम काकुस्ते, डॉ. एस. सी. सोनवणे, जितेंद्र अहिरराव, महेंद्र देसले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. पी. झेड. कुवर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी आभार मानले.





# VOTERS AWARENESS DAY

# 25 JANUARY







विद्या विकास मंडळाचे
सी.गो.पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
साक्री ता.साक्री जि.धुळे


विद्या विकास मंडळाचे
सी.गो.पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
साक्री ता.साक्री जि.धुळे

# MAHATMA JYOTIRAO PHULE BIRTH ANNIVERSARY

# 11 APRIL





# DR. BABASAHEB AMBEDKAR BIRTH ANNIVERSARY

# 14 APRIL





# DR. BABASAHEB AMBEDKAR JAYANTI

लक्ष महाराष्ट्र शुक्रवार, दि. १६ एप्रिल २०२१

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अविरत

### व्याख्यानमालेत प्रदीप सोळुंकेंचे प्रतिपादन; जिल्हाभरात विविध कार्यक्र



साक्री । सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अविरत कार्य केले. त्यांच्या या कार्याला उजाळा देतानाच आपण त्यांचे विचार आचरणात आणावेत हीच खरी या महामानवांना आदरांजली ठरेल असे मत प्रदीप सोळुंके यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सि गो पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती दिनानिमित्त व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्रमुख पाहुणे उपप्राचार्य अनंत पाटील उपस्थित होते. सोळुंके म्हणाले, महापुरुषांची जयंती नाचून साजरी करण्यापेक्षा वाचून साजरी करावी. आणि त्यांना डोक्यावर घेण्यापेक्षा डोक्यात घ्यावे. असे सांगितले. प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.चंद्रकांत कढरे, आभार आयक्यूएसीचे समन्वयक डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ.हसीन तडवी, डॉ.दिपक नगराळे, श्री.देवरे यांनी प्रयत्न केले.

लोकमत epaper.lokmat.com शनिवार, दि. १७ एप्रिल २०२१

## महापुरुषांचे विचार आचरणात आणावे

### प्रदीप साळुंके : ऑनलाईन व्याख्यानात मत

लोकमत न्यूज नेटवर्क

साक्री : सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अविरत कार्य केले. त्यांच्या या कार्याला उजाळा देतानाच आपण त्यांचे विचार आचरणात आणावेत हीच खरी या महामानवांना आदरांजली होईल, असे मत औरंगाबाद येथील प्रदीप सोळुंके यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सि. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे राष्ट्रपिता महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती दिनानिमित्त आयोजित ऑनलाइन व्याख्यानात 'महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आदर्श वैचारिक गुरु-शिष्य' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य अनंत पाटील उपस्थित होते.

प्रदीप सोळुंके बोलताना पुढे म्हणाले की महापुरुषांची जयंती नाचून साजरी करण्यापेक्षा वाचून साजरी करावी आणि त्यांना डोक्यावर घेण्यापेक्षा डोक्यात घ्यावे. कारण प्रत्येक व्यक्तीने उदारमतवादी व परिवर्तनवादी विचार आत्मसात करण्याची सुरुवात स्वतःपासून सुरू करावी, त्यातून संपूर्ण समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा फुले यांचे वैचारिक वारसदार असल्याचे मतदेखील त्यांनी प्रसंगी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी महाराष्ट्र हा पुरोगामित्वाचे दर्शन घडविणारा प्रांत असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेली संविधानिक समता ही सर्व जनसामान्यांच्या उन्नतीचे प्रमुख साधन असल्याचेदेखील त्यांनी प्रसंगी प्रतिपादित केले.

सूत्रसंचालन डॉ. चंद्रकांत कढरे यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. हसीन तडवी, डॉ. दीपक नगराळे, देवरे यांनी प्रयत्न केले.

कोरोनामुळे यंदा जिल्हाभरात महापुरुषांची जयंती पूर्णपणे वैचारिक पद्धतीने साजरी करण्याची संधी मिळाली.

# RAJASHRI CHHATRAPATI SHAU MAHARAJ BIRTH ANNIVERSARY

# 19 FEBRUARY





सकाळ जळगाव, गुरुवार, २८ जून २०१८

① राजर्षी शाहू महाराज जयंती

साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादनप्रसंगी मराठा सेवा संघाचे पदाधिकारी व प्राध्यापक.

## साक्रीच्या पाटील महाविद्यालयात शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन

म्हसदी, ता. २७ : साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात मराठा सेवा संघातर्फे काल (ता. २६) शाहू महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी डॉ. मयूर पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य आनंद पाटील, निवृत्त प्राचार्य बी. एम. भामरे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रवीण मोरे, धुळे जिल्हा मराठा सेवा संघाचे उपाध्यक्ष दीपक नांद्रे, किशोर वाघ, बाजार समितीचे संचालक श्याम देवरे, बापू भालसार आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अहिरे, डॉ. मयूर पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रवीण मोरे यांनी सूत्रसंचालन केले. आनंद पाटील यांनी आभार मानले.

# RAJASHRI CHHATRAPATI SHAU MAHARAJ

# BIRTH ANNIVERSARY

# SOCIAL JUSTICE DAY



सकाळ

धुळे, मंगळवार, २९ जून २०२१

साक्री : छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे.

## राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श घ्यावा

[illegible]

# SHIVRAJYABHISHEK DIWAS

सकाळ
धुळे, बुधवार, ९ जून २०२१

## साक्रीत शिवराज्याभिषेकदिनी व्याख्यान

म्हसदी : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व साक्री येथील विद्याविकास मंडळाच्या सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्याकडून शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शिवव्याख्याते प्रेमचंद अहिरराव यांनी 'शिवराज्याभिषेक दिन हाच स्वातंत्र्य दिन' या विषयावर व्याख्यान दिले. रासेयो समन्वयक डॉ. पंकजकुमार नन्नवरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते. डॉ. संजय सोनवणे, प्राचार्य एस. टी. सोनवणे, प्राचार्य पी. एस. सोनवणे, प्राचार्य ए. पी. खैरनार, प्राचार्य सुरेश अहिरे, उपप्राचार्य अनंत पाटील उपस्थित होते. समन्वयक डॉ. सचिन नांद्रे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक प्रा. विश्वास भामरे, आयोजन समितीचे डॉ. जगदीश पाटील, प्रा. सी. एन. घरटे, डॉ. रमेश अहिरे, प्रा. प्रणव गरुड, प्रा. शरद सोनवणे, तसेच स्थानिक आयोजन समितीचे डॉ. लहू पवार, डॉ. ज्योती वाकोडे, डॉ. हसीनखा तडवी, डॉ. दीपक नगराळे, डॉ. चंद्रकांत कढरे यांनी सहकार्य केले.

# NATIONAL UNITY DAY

# 31 OCTOBER






# INDIAN CONSTITUTION DAY

# 26 NOVEMBER












सकाळ TODAY
बुधवार, २७ नोव्हेंबर २०१९/ २



साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे वाटप करताना प्राध्यापक.

## पाटील महाविद्यालयात संविधान उद्देशिकेचे वाटप

म्हसदी : भारतीय संविधानाने जगासमोर सर्वोत्तम लोकशाहीचा आदर्श ठेवला असून, लोकशाहीचे तत्त्व समृद्ध करण्याचे सामर्थ्य भारतीय संविधानात आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी केले. साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात संविधान गौरव दिनानिमित्त कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रती भेट देऊन सामूहिक वाचन झाले. २६/११ हल्ल्यातील हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# DR.BABASAHEB AMBEDKAR MAHAPARINIRVAN DIN

# 06 DESEMBER



## महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.आंबेडकर यांना अभिवादन

विविध कार्यक्रम : विद्यार्थ्यांनी केले मनोगत व्यक्त

# KRANTI DIN

# 09 AUGUST





# VIDYAPITH NAMVISTAR DIN

# 11 AUGUST







# SAVITRIBAI PHULE

# BIRTH ANNIVERSARY

# 03 JANUARY



# MARATHI BHASHA SANVARDHAN PANDHARWADA





# MARATHI BHASHA SANVARDHAN
# PANDHARWADA

आपला महाराष्ट्र
रविवार २१ मार्च २०२१

## समाजातील घडामोडींचे प्रतिबिंब साहित्यात : डॉ.बच्छाव



साक्री,- समाजातील घडामोडींचे प्रतिबिंब साहित्यात अवतरते याच वैविध्यपूर्ण समाज भावनांचा अविष्कार आपल्या साहित्यात चितारणारे महान साहित्यिक कुसुमाग्रज होत असे प्रतिपादन डॉ श्री बी बच्छाव यांनी केले.

विद्या विकास मंडळाचे सि गो पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे मराठी विभाग व विद्यार्थी विकास विभागातर्फे कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती दिनानिमित्त आयोजित मराठी भाषा गौरव दिनि ते बोलत होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील उपस्थित होते. डॉ बच्छाव बोलताना पुढे म्हणाले की मराठी भाषा संस्कृती प्रवाहाला चालना देणारी एक भाषा आहे. आणि म्हणून आपल्या या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी सर्वांनी प्रयत्नरत व्हावे. मराठी भाषा गौरव दिन असा संकल्प करून आपल्या भाषेविषयी कृतज्ञता व्यक्त करावी असे देखील त्यांनी प्रतिपादित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात डॉ राजेंद्र अहिरे यांनी कवी कुसुमाग्रजांचे साहित्य हे सर्व समाज मनास एकत्र बांधून ठेवते असे प्रतिपादित केले. मराठी भाषा ही फक्त भाषा नसून सांस्कृतिकप्रवाहाचे वाहक असून तिचं संवर्धन करणे हा आपल्या कार्यक्रमाचा प्रमुख हेतू आहे असे देखील त्यांनी प्रतिपादित केले. उपप्राचार्य डॉ आनंद पाटील यांनी देखील मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविकमराठी विभाग प्रमुख डॉ प्रकाश साळुंखे यांनी तर आभार विद्यार्थी विकास विभागाचे डॉ लहू पवार यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी बांधव व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ BIRTH ANNIVERSARY 19 FEBRUARY



पुण्यनगरी

शनिवार,२० फेब्रुवारी २०२१

## सी.गो.पाटील महाविद्यालयात व्याख्यान

साक्री : छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वसामान्य रयतेत स्वाभिमानाची व स्वयंपूर्णतेची भावना उत्पन्न करून सर्वसमावेशक स्वराज्य निर्माण केले असे प्रतिपादन डॉ.एस.एस. पाटोळे यांनी केले. ते विद्या विकास मंडळाच्या सी.गो.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत 'छत्रपती शिवाजी महाराजः जगा वेगळा राजा' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे, उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ.अहिरे, प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे, डॉ.विजय बच्छाव यांनी मनोगत व्यक्त केले. ऑनलाइन प्रश्नमंजुषेत ४४४ लोकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संचलन इतिहास विभाग प्रमुख व आयोजक डॉ.एस.सी.सोनवणे यांनी तर प्रास्ताविक डॉ.एन.डी.भामरे यांनी केले.



आपला महाराष्ट्र

मंगळवार २३ फेब्रुवारी २०२१

## शिवरायांनी रयतेच्या मनात स्वयंपूर्णतेची भावना रुजविली : डॉ.एस.एस.पाटोळे

**पुण्य नगरी** | शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२०

## नागरिकांनी संविधानाविषयी जागरुक रहावे - प्राचार्य डॉ.अहिरे



साक्री : संविधानाबद्दल उदासीनता ही भारताला घातक ठरू शकते. म्हणून सुज्ञ नागरिकांनी संविधानाविषयी जागरूक राहून आपल्या कर्तव्याची पूर्ती करावी. त्यातून आपला देश महासत्ता म्हणून उभे राहण्यास सकारात्मक वातावरण निर्माण होईल असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी केले.

विद्या विकास मंडळाच्या सिताराम गोविंद पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभागातर्फे संविधान दिनानिमित्त कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पंचायत समितीचे विस्तार अधिकारी व्ही.व्ही.पवार, उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील प्रमुख म्हणून उपस्थित होते. भारतीय संविधान व नागरिकांचे मूलभूत कर्तव्य या विषयावर प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी मार्गदर्शन केले. संविधान जागर या उपक्रमातून संविधानाबद्दल साक्षरता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन संविधान चाचणीचेही आयोजन करण्यात आले, त्यात ६३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन व वितरण करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे ऑनलाईन सामूहिक श्रवण देखील प्रसंगी करण्यात आले. कार्यक्रमासाठी आई क्यू ए सी समन्वयक डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण, शारीरिक शिक्षण व क्रीडाचे संचालक डॉ.हसीनखा तडवी, राज्यशास्त्र विभागाचे डॉ.चंद्रकांत कढरे, प्रा.भूषण अहिरराव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.विश्वास भामरे, डॉ.एस.सी. सोनवणे, डॉ.ज्योती वाकोडे, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ.लहू पवार, डॉ.ए.पी. निकम आदींनी परिश्रम घेतले.